**बृहन्मुंबई महानगरपालिका**

ई मेल : stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोन नं.: 022 24063001 / 02

**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व**

**लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२**

क्र.लोटिरु./१४६/अधिष्ठाता, दिनांक २१.०७.२०२२.

**विषय:-** **लो.टि.म.स.रुग्णालयातील सुका कचरा वर्गीकरण केंद्र व** ओल्या कच-यापासून खतनिर्मिती केंद्र नोंदणीकृत **संस्थेला व्यवस्थापनाकरिता देण्यासाठी सोडत पध्दतीने संस्थेची निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याबाबत.**

**संदर्भ:-** **१. परिपत्रक क्र. उपआयुक्त/घकव्य/6921/ दि. 26.02.2014.**

**२. क्र. उपायुक्त/सा.आ/३२४, दि. ३०.११.२०२१.**

<u>योजनेचे वर्णन:-</u>

रूग्णालयातील सुका कचरा गोळा केल्यानंतर त्याची वर्गवारी करुन तो पुनर्वापरासाठी देण्यासाठी त्याची विशिष्ट वर्गवारी/प्रतवारी पुन्हा करावी लागते. या कामात कचरा वेचकांच्या बचत गटांना सामावून घेण्याचे धोरण मुंबई महानगरपालिका पूर्वीपासून राबवित आहे. सदर मोहीम अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने व ओल्या कच-यापासून खत निर्मिती करण्यासाठी, सुका कचरा वर्गीकरण केंद्रे कचरा वेचकांच्या संस्था/बचत गटांना देण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर अधिष्ठाता यांच्याकडून घेण्यांत येत आहे.

लो.टि.म.स.रुग्णालयात चार ठिकाणी सुका कच-याचे वर्गीकरण करण्याकरीता सुका कचरा वर्गीकरण केंद्र तसेच ओल्या कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रीया करुन खत निर्मिती केंद्र उभारण्यांत आलेले आहे. सदर केंद्रात सुका कचरा वर्गीकरण करण्याकरीता नोंदणीकृत संस्थेची/ कचरा वेचकांच्या संस्था/बचत गटांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये सदर संस्थांची नियुक्ती नोटीस बोर्डावर तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात देऊन करण्याचे निर्देश आहेत व एकापेक्षा जास्त बचत गट/कचरा वेचक संस्था इच्छुक असल्यास त्यांची निवड सोडत पध्दतीने करण्याचे निर्देशित आहे.

लो.टि.म.स.रुग्णालयात खालील चार ठिकाणी सुका कचरा वर्गीकरण केंद्र व खत निर्मिती केंद्र उभारण्यांत आले आहे.

1. अधिष्ठाता कार्यालयाची मागची बाजू.
2. नर्सेस क्वॉर्टर्स
3. ओल्ड बॅरॅक्स
4. नागरी आरोग्य केंद्र, धारावी.

उपरोक्त चार ठिकाणी उभारलेल्या सुका कचरा वर्गीकरण केंद्र व खत निर्मिती केंद्र चालविण्याकरीता खालील अटी/शर्तीसापेक्ष कचरा वेचकांच्या संस्था/बचत गटाची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. **प्रतिसादाबाबतची खाली नमुद केलेली कागदपत्रे सीलबंद लिफाफ्यात दिनांक २२.०७.२०२२ ते ०५.०८.२०२२, दुपारी ४.०० वाजेपर्यंत निविदा विभागातील सीलबंद ड्रॉप-बॉक्स मध्ये जमा करावीत व त्यासोबत ठेवलेल्या रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. ड्रॉप-बॉक्स व्यतिरिक्त अन्य कोणत्याही विभागात सीलबंद लिफाफे जमा केल्यास रूग्णालय प्रशासन जबाबदार राहणार नाही व अशी कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. संस्था निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

1. अर्ज करणा-या कचरा वेचक संस्था/बचत गट यांना सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्याचा,ओल्या कच-यापासून खत निर्मिती करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. सदर कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र,ज्या संस्थेमध्ये काम केले असेल त्या संस्थेकडून प्राप्त करुन सादर करावे.
2. सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्यासाठी अर्ज करणारी संस्था ही कचरा वेचकांची संस्था म्हणून धर्मदाय आयुक्त यांच्याकडे मागील ३ वर्षापासून (अर्ज सादर करण्याच्या दिनांका अगोदर) नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर संस्थेचे सभासद कचरा वेचक असणे आवश्यक आहे.
3. संस्थेबाबतची संपुर्ण माहिती जसे संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेची वार्षिक उलाढाल, संस्थेचा आदर्श उपविधी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
4. कचरा वेचक संस्था/बचत गट यांनी त्यांच्याकडील नोंदणीकृत असलेल्या कचरा वेचक सभासदांची यादी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
5. सदर संस्थेने अर्ज करतेवेळी अर्जासोबत संस्थेची उद्दिष्टे व ध्येयपूर्तीची कागदपत्रे /जाहीरनामा धर्मादाय आयुक्त यांना सादर केल्याबाबतची माहिती/पुरावा तसेच उद्दिष्टे व ध्येयपूर्ती यांची एक प्रत सादर करणे आवश्यक आहे.

## अटी व शर्ती

1. निवडलेल्या कचरा वेचक संस्था/बचत गट यांना रुग्णालयातील सुक्या कच-याचे वर्गीकरण व ओल्या कच-यापासून खत निर्मिती करण्याच्या बदल्यात लो.टि.म.स. रुग्णालयातील सर्व सुका कचरा मोफत देण्यांत येईल व त्याव्यतिरिक्त इतर कोणताही आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.
2. सदर कचरा वेचक संस्था/बचत गट यांच्या ओल्या कच-यापासून खत निर्मिती करण्याच्या कामाचा आढावा प्रथमत: ६ महिन्यानंतर घेण्यात येईल व कामगिरी समाधानकारक असल्यास त्यानंतर पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येईल. सदर कालावधीत कांही

प्रश्न अथवा अडचणी उदभवल्यास कोणतीही पूर्वसचूना न देता, लो.टि.म.स. रुग्णालयाकडून त्यांचे काम काढून घेण्यांत येईल.

3. सुका कचरा वर्गीकरणाची जागा/इमारत व अन्य सोई यांची मालकी पूर्णपणे महापालिकेची राहील. या जागेवर महापालिकेव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्ती अथवा संस्थेचा कोणताही मालकी हक्क असणार नाही अथवा निर्माण करता येणार नाही. या जागी ''मुंबई महानगरपालिका सुका कचरा वर्गीकरण केंद्र'' असा फलक कचरा वेचक संस्था/बचत गट स्वखर्चाने लावेल. परंतू महापालिकेच्या जागेचा उपयोग इतर कोणत्याही कारणासाठी अथवा संस्थेच्या जाहिरातीसाठी करता येणार नाही. तसेच संस्थेची वाहने रुग्णालयात उभी करता येणार नाहीत.
4. या जागेच्या वापरासाठी संबंधित बचतगटाकडून कोणतेही भाडे अथवा मोबदला आकारण्यांत येणार नाही.
5. सुका कचरा वर्गीकरणासाठी देतांना कोणतेही करारपत्र अथवा मक्ता निर्माण करण्यात येणार नाही. संबंधित संस्थेला जागा रूग्णालय प्रशासन पुढील निर्णय होईपर्यंत “फक्त वापरासाठी ” देईल तसेच त्यांना करण्यात आलेले वाटप भविष्यात कोणत्याही वेळी, कोणतेही कारण अथवा नुकसान भरपाई न देता महापालिका रद्द करू शकते असे नमूद करून वाटपपत्र, सर्वसाधारण पत्राने अधिष्ठात्यांच्या मान्यता वा स्वाक्षरीने संबंधित संस्थेला देण्यात येईल.
6. ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे वेळी कामगारांना सुरक्षा उपकरणे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कचरावेचक संस्थेची असेल तसेच कचरा वर्गीकरण्याच्या वेळी कांही अपघात घडल्यास त्याकरीता लो.टि.म.स. रुग्णालय जबाबदार राहणार नाही.
7. ओला व सुका कचरा वर्गीकरण केंद्राचा परिसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक आहे. अन्यथा रु. ५००/- प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.
8. ओला व सुका कचरा वर्गीकरणाचे वेळी कामगारांचे प्रशिक्षण, आरोग्य, वेतन व पर्यवेक्षण तसेच कामासंबंधी कामगारांच्या काही तक्रारी असल्यास त्याकरिता कचरा वेचक संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. कामगारांच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारींशी लो.टि.म.स.रुग्णालयाचा काहीही संबंध असणार नाही तसे लेखी प्रतिज्ञापत्र निवडलेल्या संस्थेकडून घेण्यात येईल.
9. सुका कचरा वर्गीकरण केंद्रात रूग्णालयातील कचरा वर्गीकरण करून तो कचरा पुनर्वापरासाठी विकत घेणा-यांना विकण्याचा पूर्ण अधिकार ज्या संस्थेला कामाचे वाटप करण्यात आले त्यांना देण्यात येईल. त्याद्वारे प्राप्त किंमत व मोबदलाही पूर्णपणे कचरा वेचक संस्था/बचत गट संस्थेलाच मिळेल.

10. सुका कचरा वर्गीकरणाची जागा, टाकी, वीजप्रवाह, तसेच पाणी, इ. ची सोय लो.टि.म.स. रुग्णालयाकडून करण्यांत आलेली आहे. लो.टि.म.स. रुग्णालयातील सर्व कक्ष, उपहारगृहे, रुग्णांचे किचन, नर्सेस किचन तसेच रुग्णालय आवार व परिसरात दररोज ४०० किलो इतका ओला कचरा प्रतिदिन निघतो, त्यापासून खत निर्मिती करणे बंधनकारक आहे.

11. कचरा वर्गीकरणाबरोबरच परिसरातील भटकी कुत्री व मांजरी यांचा उपद्रव टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची जबाबदारी सदर संस्थेची असेल.

12. प्रशासनाने देऊ केलेली कामे ही आपणांस विना तक्रार करावी लागतील.

13. सुका कचरा वर्गीकरण केंद्रावर सुक्या कच-याचा अवास्तव साठा करणे, आग व अन्य कारणामुळे धोक्याचे असल्याने असा साठा मर्यादित ठेवण्याची दक्षता बचत गटाने घ्यावी. अशा प्रकारे नैसर्गिक अथवा मानवनिर्मित कारणाने झालेल्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी महापालिकेची असणार नाही. तसेच तेथे काम करणा-या कचरा वेचक, कामगार अथवा आजूबाजूस राहणारे व ये-जा करणारे इसम यांना इजा झाल्यास त्याची जबाबदारी बचत गटाची असेल या आशयाचा रु.२००/- स्टॅम्प पेपरवरील इंडेम्नीटी बॉड बचत गटाकडून घेण्यात येईल व या जबाबदारीतून रूग्णालयीन प्रशासनाला-अधिका-यांना/महापालिकेला वगळल्याचे बॉडमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

14. अकार्यक्षम अथवा बेजबाबदार तसेच गैरवर्तणूक अथवा गुन्हेगारी इत्यादी कारणांमुळे बचत गटाकडील काम कारणे दाखवा नोटीस देऊन अधिष्ठात्यांच्या मान्यतेने काढून घेण्यात येईल व त्यांना दिलेले वाटप पत्र केव्हाही रद्द करून जागेचा ताबा रूग्णालय घेईल.

15. रूग्णालयातील सुका कचरा वर्गीकरण केंद्रे चालविण्यासाठी कचरा वेचक संस्था /बचत गट यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जांच्या संपूर्णत: छाननीनंतर सदर संस्थांची मूळ कागदपत्रे प्रत्यक्षात तपासली जातील त्यानंतर पात्र ठरलेल्या संस्थामधून सोडत पध्दतीने निवडलेल्या संस्थेची नियुक्ती अधिष्ठात्यांच्या मंजूरीने केली जाईल.

16. कोणत्याही संस्थेने खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास सदर संस्थेला अपात्र ठरविण्यात येऊन त्यांचा समावेश काळया यादीत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांना कळविण्यात येईल.

17. एकापेक्षा जास्त संस्था/बचत गट इच्छुक **नसल्यास** प्राप्त अर्जाची छाननी करुन कार्यादेश देण्यात येईल.

18. एकापेक्षा जास्त संस्था/बचत गट इच्छुक **असल्यास** प्राप्त अर्जाची छाननी करुन, सोडत पध्दतीने संस्था/बचत गटाची नियुक्ती करण्यात येईल. सोडत पध्दतीत प्रथम निवड झालेल्या संस्था/बचत गटास कार्यादेश देण्यात येईल. तसेच सोडत पध्दतीने आणखी एका संस्थेची निवड करून तिला राखीव ठेवण्यात येईल.

19. प्रथम निवड झालेल्या संस्थेबाबत प्रशासनास तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास तात्काळ काम बंद करण्याचे आदेश देऊन राखीव ठेवलेल्या संस्थेस काम देण्यात येईल.

**डॉ. मोहन जोशी**
**अधिष्ठाता**
**लोटिमवैम आणि लोटिमस रुग्णालय**
**शीव, मुंबई ४०० ०२२**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

ई मेल : stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोन नं.: 022 24063001 / 02

**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व**

**लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२**

क्र.लोटिरु./१४६/अधिष्ठाता, दिनांक २१.०७.२०२२.

**विषयः-** **लो.टि.म.स.रुग्णालयातील सुका कचरा वर्गीकरण केंद्र व** ओल्या कच-यापासून खतनिर्मिती केंद्र नोंदणीकृत **संस्थेला व्यवस्थापनाकरिता देण्यासाठी सोडत पध्दतीने संस्थेची निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याबाबत.**

**संदर्भः-** **१. परिपत्रक क्र. उपआयुक्त/घकव्य/6921/ दि. 26.02.2014.**
**२. क्र. उपायुक्त/सा.आ/३२४, दि. ३०.११.२०२१.**

उपर्निदिष्ट संदर्भान्वये **लो.टि.म.स.रुग्णालयातील सुका कचरा वर्गीकरण केंद्र व** ओल्या कच-यापासून खतनिर्मिती केंद्र नोंदणीकृत **संस्थेला व्यवस्थापनाकरिता देण्यासाठी सोडत पध्दतीने संस्थेची निवड करण्याबाबत** महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर इच्छुक संस्थांकडून **स्वारस्याची अभिव्यक्ती** मागविण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | परिसर | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1. | **सुका कचरा वर्गीकरण केंद्र व** ओल्या कच-यापासून खतनिर्मिती केंद्र चालविण्याबाबत | अधिष्ठाता कार्यालयाची मागची बाजू. | सदर कचरा वेचक संस्था/बचत गट यांना **सुक्या कच-याचे वर्गीकरण व** ओल्या कच-यापासून खतनिर्मिती करण्याच्या बदल्यात लो.टि.म.स. रुग्णालयातील सर्व सुका कचरा मोफत देण्यांत येईल व त्याव्यतिरिक्त इतर कुठलाही आर्थिक मोबदला दिला जाणार नाही. |
| | | नर्सेस क्वॉर्टर्स | |
| | | ओल्ड बॅरॅक्स | |
| | | नागरी आरोग्य केंद्र, धारावी. | |

**डॉ. मोहन जोशी**
**अधिष्ठाता**
**लोटिमवैम आणि लोटिमस रुग्णालय**
**शीव, मुंबई ४०० ०२२**